# प्रेस नोट

सर्व जनतेला सुचित करण्यात येते कि, राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांनी त्यांचे पत्र दिनांक २७ डिसेंबर २०१८ अन्वये गडचिरोली जिल्हयातील नगर परिषद, आरमोरी येथील सार्वत्रिक निवडणूक २०१८-१९ निवडणूकीसाठी निवडणूक कार्यक्रम जाहीर केलेला आहे.

त्यानुसार नगर परिषद, आरमोरी या नगरपरिषदेची सार्वत्रिक निवडणूक होणार असून या नगर परिषदेचे निवडणूकीसाठी नामनिर्देशनपत्र दिनांक **02/01/2019 (बुधवार) ते 09/01/2019 (बुधवार)** (रविवार दि.**06/01/2019** रोजीचे सुटीच्या दिवशी **नामनिर्देशन पत्रे देण्यात येणार नाहीत व स्वीकारली** जाणार नही) या कालावधीत सकाळी 11.00 ते 03.00 वाजेपर्यंत नगर परिषद, आरमोरी येथे स्विकारण्यात येतील. नामनिर्देशन पत्राची छाननी दिनांक **10.01.2019** (गुरुवार) ला सकाळी 11.00 वाजेपासून करण्यात येईल व मतदानाचा कालावधी दिनांक **27.01.2019** (रविवार) वेळ सकाळी 7.30 पासून ते सायंकाळी 5.30 पर्यंत राहील तसेच मतमोजणी व निकाल दिनांक **28.01.2019** (सोमवार) सकाळी 10.00 वाजल्यापासून तहसिल कार्यालय आरमोरी यथे करण्यात येईल.

उपरोक्त निवडणूकीसाठी निवडणूक लढविण्यास इच्छूक असलेल्या प्रत्येक व्यक्तिसाठी आपले नामनिर्देशनपत्र **https//panchayatelection.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यांत आले आहे. तरी उमेदवारांनी संकेतस्थळावर दिलेल्या नामनिर्देशनपत्र व घोषणापत्राचा नमुना भरुन त्यांचे प्रिंट आऊट घेऊन त्यावर स्वाक्षरी करावी व स्वाक्षरी केलेली प्रिंट आऊट नामनिर्देशनपत्र व घोषणापत्र म्हणून उमेदवाराने नगर परिषद, आरमोरी येथे संबधित निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, कुरखेडा यांचेकडे विहीत वेळेत व विहीत पध्दतीने दाखल करावे.

सार्वत्रिक निवडणूक असलेल्या आरमोरी नगर परिषद क्षेत्रात दिनांक 27/12/2018 चे रात्री 12.00 वाजेपासून ते निवडणूक निकाल जाहीर होईपर्यत आचारसंहिता अंमलात राहील. आचार संहिते मधिल तरतूदीचे सर्वतोपरी पालन होईल, याची संबधितांनी दक्षता घ्यावी. नगर परिषद स्तरावरील लोकशाही बळकट करणेसाठी या निवडणूकीत सर्व मतदारांनी मतदान करावे. असे जिल्हाधिकारी गडचिरोली यांचे कडून आवाहन करण्यात येत आहे.

**जिल्हाधिकारी, गडचिरोली.**

जिल्हाधिकारी, गडचिरेली यांचे कार्यालय
क्रमांक कार्या-10/कली/नपाप्र/सं.क्र./कावि/358/2018
दिनांक 28/12/2018

**प्रतिलीपी :-** जिल्हा माहिती अधिकारी, गडचिरोली यांनी प्रादेशिक व स्थानिक स्तरावरील दैनिक वृत्तपत्रात प्रेस नोट प्रसिध्द करण्यास्तव अग्रेषित.

**जिल्हाधिकारी, गडचिरोली.**

# आरमोरी नगर परिषद च्या सार्वत्रिक निवडणूकीसाठी निवडणूक कार्यक्रम 2018-19

अनुसूचि

| नगर परिषदेचे नाव | निवडणूक निर्णय अधिकाऱ्याचे नाव | सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांचे नाव व पदनाम | नामनिर्देशन पत्र देण्याचे व घेण्याचे ज्या दिवशी सुरु करण्यात येईल तो दिनांक व वेळ | नाम निर्देशन पत्र भरण्यासाठी चा अंतिम दिनांक व वेळ | नामनिर्देशन पत्र भरण्याचे ठिकाण | नामनिर्देशन पत्र अर्जाची छाननी व वैधरित्या नामनिर्देशित झालेल्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक | नामनिर्देशन पत्र छाननी करणे व नामनिर्देशनपत्र मागे घेण्याचे ठिकाण | वैध नामनिर्देशित उमेदवारांची यादी प्रकाशित करण्याचा दिनांक | नामनिर्देशन पत्र मागे घेण्याचा अंतिम दिनांक अपील नसेल तेथे | अपिल असल्यास नामनिर्देशन पत्र मागे घेण्यासाठी अंतिम दिनांक | निवडणूक चिन्ह नेमून देण्याचा तसेच अंतिमरित्या निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक | जिल्हाधिकारी किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने मतदान केंद्राची व मतदान केंद्रनिहाय मतदार यादी प्रसिध्द करणे | आवश्यक असल्यास मतदानाची तारीख व वेळ | मतमोजणी व निकाल जाहिर करण्याचा दिनांक | मतमोजणीचे ठिकाण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 |
| आरमोरी नगर परिषद | श्री. समाधान शेंडगे, उप विभागीय अधिकारी, कुरखेडा | श्री. वाय. टि. धाईत, तहसिलदार तथा प्रशासक, नगर परिषद, आरमोरी<br>श्री. सतिश चौधरी, मुख्याधिकारी, नगर परिषद, आरमोरी | दिनांक 02.01.2019 (बुधवार)सकाळी 11.00 ते 09.01.2019 (बुधवार) दुपारी 03.00 पर्यंत रविवार दिनांक 06.01.2019 या सुट्टीच्या दिवशी नामनिर्देशनपत्र स्विकारण्यात येणार नाहीत. | दिनांक 09.01.2019 सकाळी 11.00 वाजेपासून दुपारी 3.00 पर्यंत | नगर परिषद, आरमोरी | दिनांक 10.01.2019 (गुरुवार) सकाळी 11.00 वाजल्यापासून | नगर परिषद, आरमोरी | दिनांक 10.01.2019 (गुरुवार) | दिनांक 17.01.2019 (गुरुवार) दुपारी 3.00 वाजेपर्यंत | अपिलाचा निर्णय ज्या तारखेस करण्यात येईल त्या तारखेनंतर तिसऱ्या दिवशी किंवा तत्पूर्वी. | उमेदवारी मागे घेण्यासाठी च्या शेवटच्या दिवसानंतर लगतच्या दिवशी दिनांक 11.01.2019 सकाळी 11.00 वाजेपासून | आरमोरी नगर परिषदेच्या अंतिम प्रभाग निहाय मतदार याद्या अधिप्रमाणित करुन दिनांक 03.11.2018 रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या असून मतदान केंद्र निहाय मतदार याद्या दिनांक 05.11.2018 रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या आहेत. | दिनांक 27.01.2019 (रविवार) सकाळी 7.30 पासून ते सायंकाळी 5.30 पर्यंत | दिनांक 28.01.2019 (सोमवार) सकाळी 10.00 वाजल्यापासून | तहसिल कार्यालय, आरमोरी |

टिप :- निर्वाचन अधिकाऱ्याच्या नामनिर्देशनपत्र स्वीकारण्याच्या किंवा नाकारण्याच्या निर्णयाविरुध्द अपील अधिकाऱ्याकडे अपील करण्याच्या शेवटच्या तारखेसाठी महाराष्ट्र नगर पालिका निवडणूक नियम 1966 यातील नियम 15 पहा.

दिनांक 29.12.2018

ठिकाण :- गडचिरोली

(शेखर सिंह)

जिल्हाधिकारी गडचिरोली

Scanned by CamScanner